**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त द्वितीय अपिल**

**अपिल क्र.१४६०/२०११**
जा.क्र.
दिनांक -

अर्जदार तथा अपिलकर्ता
प्रतिभा चंद्रशेखर गिरी
लखमाई प्लॉट नं.९, धन्वंतरी कॅालनी
अरुणोदय इंग्लिश शाळेजवळ, व्हि एम व्ही रोड
अमरावती

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अप्पर आयुक्त, विभागिय आयुक्त कार्यालय
अमरावती

२. जन माहिती अधिकारी तथा
अव्वल कारकुन (न्याय शाखा), विभागिय आयुक्त कार्यालय
अमरावती

**(आदेश पारीत दिनांक ०५/०१/२०१२)**

**- अंतरिम निर्णय -**

अर्जदार तथा अपिलकर्ता तर्फे ॲड.व्हि.एस.गणोस्कर हजर आहे. श्री सुरेशकुमार इंगोले, प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त (प्रभारी) अमरावती हजर आहेत. श्री संजय आवारे, जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, विभागिय आयुक्त कार्यालय अमरावती हजर आहे.

अर्जदार तथा अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जोडपत्र-अ नुसार दि.२८/१२/१० रोजी माहिती अधिकारी, अप्पर आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे अर्ज करुन ५ मुद्दयांमध्ये माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.५/१/१२ ला खुलासा दाखल केला त्यात आयुक्त कार्यालयाशी संबंधित माहिती अर्जदाराला ११/१/११ ला पुरविली असल्याचे म्हटले आहे. मुद्दा क्र.१ बाबत जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध नसल्याचे सांगितले. मुद्दा क्र.१ वर नमुद पत्राचा जावक क्र.५६८/२००५ दि.६/७/०५ असा आहे त्यामुळे सदर पत्राची कार्यालयातील जावक नोंदवहीत नोंद असल्यास त्यासंबंधी जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा शोध घेवून त्यासंबंधी अहवाल पुढील तारखेला आयोगासमोर सादर करावा. माहिती अधिकारी, अप्पर आयुक्त कार्यालय, अमरावती यांनी मुद्दा क्र.१,३ व ५ ची माहिती दिली परंतु ती खोटी, दिशाभुल करणारी व समाधानकारक नाही असे अर्जदाराने द्वितीय अपीलामध्ये नमुद केले. तेंव्हा यासंबंधी जन माहिती अधिकारी यांनी पुढील तारखेला लेखी खुलासा सादर करावा. प्रथम अपीलामध्ये दि.३/३/११ रोजी अप्पर आयुक्त अमरावती यांनी दिलेल्या निर्णयानुसार झालेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात यावा.

अर्जदाराच्या अर्जामधील मुद्दा क्र.२ व ४ ची माहिती उपविभागिय अधिकारी अमरावती यांचेशी संबंधित असुन त्यासंबंधी अर्जदाराचा अर्ज कलम ६(३) नुसार दि.३०/१२/१० ला जन माहिती अधिकारी, उपविभागिय अधिकारी कार्यालय, अमरावती यांचेकडे जन माहिती अधिकारी, न्याय शाखा, आयुक्त कार्यालय, अमरावती यांनी हस्तांतरीत केला आहे. तसेच दि.१/३/११ रोजी उपविभागिय अधिकारी अमरावती यांनी सुनावणी घेतली परंतु आदेश पारीत केला नाही व समाधानकारक माहिती मिळाली नाही असे अर्जदाराचे वकीलातर्फे सांगण्यात आले. सदर बाबतीत उपविभागिय अधिकारी, अमरावती यांचे म्हणणे पुढील सुनावणी दि.१९/१/१२ ला ऐकण्यात येईल. तेंव्हा त्यांनी पुढील तारखेला संबंधित माहिती/लेखी खुलाशासह या आयोगासमोर हजर रहावे. तसेच वरील उत्तरवादी क्र.१ व २ यांनी लेखी खुलाशासह स्वत: हजर रहावे.

**पुढील तारीख - १९/०१/२०१२ (१०=०० वाजता)**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**प्रत - उपविभागिय अधिकारी (महसुल), अमरावती**

जिसकार/